13 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे 'क्यूएस रँकिंग' वाढले

## दक्षिण आशियाई क्रमवारीत १८७ वा क्रमांक; कामगिरीमध्ये सुधारणा

कोल्हापूर, ता. १२ : सायमंड (क्यूएस) यांनी जाहीर केलेल्या आशियाई युनिव्हर्सिटी रँकिंग (२०२५) मध्ये शिवाजी विद्यापीठाचे स्थान वाढले आहे. गेल्यावर्षीच्या कामगिरीमध्ये विद्यापीठाने थोडीशी सुधारणा केली. त्यामुळे यंदा ६२१ ते ६४० रँकबँडमध्ये विद्यापीठाला स्थान मिळविता आले. त्यासह दक्षिण आशियाई क्रमवारीमध्ये (एशिया सदर्न) १८७ व्या क्रमांकावर जाता आले आहे.



आशियातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांची यादी नुकतीच क्यूएस रँकिंगने जारी करण्यात आली. त्यासाठी संस्थात्मक प्रतिष्ठा, रिसर्च आऊटपूट, वैश्विक- सहभागिता, पेपर्स पर फॅकल्टी, नियोक्ता प्रतिष्ठा,

> 'क्यूएस रँकिंगमध्ये यावर्षी विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकले आहे. गेल्या वर्षभरात शैक्षणिक उपक्रम, संशोधन, पायाभूत सुविधा आणि अभ्यासक्रमात काही सुधारणा केल्या आहेत. त्याचा चांगला फायदा झाला आहे. रँकिंग आणखी वाढविण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू

शैक्षणिक प्रतिष्ठा, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क, विद्याशाखा-विद्यार्थी गुणोत्तर, आंतरराष्ट्रीय विद्याशाखा गुणोत्तर आणि पीएच.डी.प्राप्त शिक्षक या निकषांवर संस्थांचे परीक्षण करण्यात आले. या रँकिंगमध्ये सर्वोत्तम उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांच्या यादीतील स्थान मिळविण्यात शिवाजी विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकले आहे. गेल्यावर्षी या क्रमवारीत विद्यापीठ ६०० ते ६५० या रँकबँडमध्ये होते. दक्षिण आशियाई क्रमवारीमध्ये १८९ क्रमांक होता. यावर्षी त्यामध्ये थोडीशी सुधारणा झाली आहे.

| क्रमवारीतील निकषनिहाय गुणसंख्या (पर्सेंटाईलमध्ये) | |
|---|---|
| संशोधन व शोध | २४.२ |
| शैक्षणिक अनुभव | ८०.३ |
| शैक्षणिक प्रतिष्ठा | ८.७ |
| आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्क | ३.२ |
| आंतरराष्ट्रीय विद्यार्थी | १.८ |
| सायटेशन्स पर पेपर | २४.२ |
| पेपर्स पर फॅकल्टी | ८०.३ |
| आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गुणोत्तर | ५.६ |
| पीएच.डी. शिक्षक | ३१.१ |
| आऊटबॉऊंड एक्स्चेंज | १ |
| इनबॉऊंड एक्स्चेंज | १.१ |

13 NOV 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा पाच वर्षाला शंभर पेटंटचा मानस

## नवोक्रम, नवसंशोधन व साहचार्य केंद्रांतर्गत संशोधनाला मिळतेय चालना

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत नवोक्रम, नवसंशोधन साहचार्य केंद्रांतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. या विभागाने पाच वर्षांचा आराखडा तयार केला असून संशोधनाला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. विद्यापीठ अंतर्गत वर्षाला २५ असे पाच वर्षात शंभर पेटंट घेण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. त्यादृष्टीने संशोधकांना निधीसह सर्वोतोपरी मदत करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. या निर्णयाचे संशोधकांकडून स्वागत होत आहे.

शिवाजी विद्यापीठात शंभरपेक्षा जास्त संशोधकांचे संशोधन जागतिक पातळीवरील क्रमवारीत झळकले आहे. तसेच अनेक संशोधकांनी पेटंटसुध्दा मिळवले असून त्याचा फायदा विद्यापीठ, संशोधक आणि ज्या कंपनीबरोबर करार केला आहे त्या संबंधीत कंपनीला होतो. त्यामुळे नवोक्रम, नवसंशोधन साहचार्य केंद्रांतर्गत वर्षाला २० पेटंट, २० स्टार्टअप, १ हजार संशोधन पेपर आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील २० सामंजस्य करार करण्यासाठी संशोधकांसह प्रशासन प्रयत्नशील आहे. विज्ञान विभागासह वाणिज्य व कला विभागातील संशोधकांनीही पेटंट मिळवले आहे. तसेच रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र विषयात जास्तीत जास्त पेटंट आहेत. विद्यापीठ प्रशासनातील १३५ संशोधकांनी पेटंट मिळवले आहेत. तसेच स्टार्टअप १०३ संशोधकांनी प्रस्ताव जमा केला होता. त्यापैकी पाच संशोधकांना कमीतकमी तीन तर जास्तीत जास्त पाच लाख रूपयांचे अनुदान उद्योगासाठी दिले जाणार आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी अधिविभागासह महाविद्यालयांवर १२५ स्टार्टअप सेल उभारले जाणार आहेत.

संशोधकांना परदेशात संशोधन करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच विदेशातील अनेक संशोधकही विद्यापीठात संशोधनासाठी येत आहेत. त्यात पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्राची ख्याती देश-विदेशात पोहचली आहे.



- विद्यापीठाकडे सध्या १३५ पेटंट
- स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योगजगत वाढीसाठी प्रयत्न

### विद्यापीठाला उद्योगजगतेत राष्ट्रीय पातळीवर घेवून जाण्याचा प्रयत्न

शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत शिक्षणातून उद्योग निर्मिती व व्यवसाय वृध्दींगत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी संशोधन व स्टार्टअपच्या माध्यमातून हा विभाग कार्यरत आहे. येथील इनोव्हेशन आणि स्टार्टअपसाठी कुलगुरू व प्रकुलगुरू यांचे मार्गदर्शन लाभत असून, उद्योजगतामध्ये विद्यापीठाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेवून जाण्याचा प्रयत्न सुरू आहे.

डॉ. सागर डेळेकर (समन्वयक, नवोक्रम, नवसंशोधन साहचार्य केंद्र)

### स्टार्टअपची स्वतंत्र इमारत उभारली जाणार

संशोधकांना मूलभूत व स्वतंत्र भौतिक सुविधा मिळाव्या यासाठी प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत २० कोटींचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला होता. हा प्रस्ताव मंजूर झाला असून त्यापैकी ४ कोटी ५० लाख रूपये खर्च करून स्टार्टअपसाठी स्वतंत्र इमारत उभारली जाणार आहे. केंद्राच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम मंत्रालयातर्फे उद्योगासाठी पोस्ट बिझनेस इन्स्टिट्यूटला मान्यता मिळाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2024
तरुण भारत

# नेट परीक्षेत नवनाथ चव्हाण देशात तृतीय

. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून अभिनंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

एनटीए व सीएसआयआर यांच्या वतीने देशस्तरावरील सहाय्यक प्राध्यापक पात्रता (नेट) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाचा माजी विद्यार्थी नवनाथ चव्हाण यांनी देशात तृतीय क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. २५ जुलै २०२४ रोजी झालेल्या या परीक्षेत २५ हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.



नवनाथ चव्हाण यांचे पदव्युत्तर शिक्षण भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये २००९ साली पूर्ण झाले. सध्या ते प्रा. डॉ. आर. के. निमठ यांच्याकडे संशोधन करत आहेत. ते नॅनोसायन्स अधिविभागात कार्यरत आहेत. नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अधिविभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी चव्हाण यांचे अभिनंदन केले. नेट परीक्षेसाठी भौतिकशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक, आई, वडील, पत्नी व मुलगा यांचे प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांनी सांगितले. अधिविभागातून बाहेर पडलेले विद्यार्थी जगभरात संशोधन क्षेत्रात आघाडीवर आहेत.

अधिविभागामध्ये विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. तसेच अधिविभागामध्ये राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले जाते. अधिविभागातील प्राध्यापकांचा संशोधनामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक आहे, असे डॉ. सोनकवडे यांनी सांगितले.

13 NOV 2024

सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'घाळी'च्या सहा खेळाडूंची हॉकी संघात निवड

गडहिंग्लज, ता. १२ : येथील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या महिला हॉकी संघाने सलग तिसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. या संघातील सहा खेळाडूंची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठात निवड झाली आहे.

अमृता भोसले, वासंती वाढगोळ, कृष्णा माने, स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, स्वप्नाली माने यांचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना संस्थेचे पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांचे प्रोत्साहन, तर शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन मिळाले.



गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाच्या महिला हॉकी संघात निवड झालेल्या घाळी महाविद्यालयाच्या खेळाडू.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2024
पुण्यनगरी

# नवनाथ चव्हाण नेट परीक्षेत देशात तिसरे

**कोल्हापूर :** एनटीए व सीएसआयआर यांच्या वतीने देशस्तरावरील सहायक प्राध्यापक पात्रता परीक्षेचा म्हणजेच नेट परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. सदर परीक्षा २५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी दिली होती. नेट परीक्षेत शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागामधील माजी विद्यार्थी नवनाथ काशीनाथ चव्हाण यांनी देशात तिसरे येऊन घवघवीत यश प्राप्त केले आहे.



त्यांचे पदव्युत्तर शिक्षण भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये २००९ साली पूर्ण झाले. सध्या ते प्रा. डॉ. आर. के. निमठ यांच्याकडे संशोधन करत आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोसायन्स अधिविभागात कार्यरत आहेत. नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी नवनाथ चव्हाण यांचे अभिनंदन केले. नेट परीक्षेसाठी भौतिकशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक, आई, वडील, पत्नी व मुलगा यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाल्याचे चव्हाण यांनी नमूद केले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील आणि कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या प्रोत्साहनामुळेच हे सर्व शक्य होत आहे, असे भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञान-तंत्रज्ञान

# हवा गुणवत्ता निर्देशांक!

डॉ. व्ही.एन. शिंदे

दरवर्षी पावसाळा संपला की हवा प्रदूषणाच्या चर्चा सुरू होतात. हवेचे प्रदूषण दिवसेंदिवस गंभीर बनत चालले आहे. हवेची गुणवत्ता कशी आहे हे ठरवण्यासाठी हवा गुणवत्ता निर्देशांक ही भौतिक राशी निश्चित करण्यात आली. समाजाला हवा कशी आहे, हे समजावे या हेतूने ही नवी राशी निश्चित केली. विविध देशांमध्ये मापनाच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. मात्र, या विषयाबाबत म्हणावी तशी जागरूकता नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अजूनही समाज, शिक्षण व्यवस्था मान्य करायला तयार नसल्या तरी अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा नाहीत. त्या अन्न, पाणी आणि हवा आहेत; त्यामुळेच निसर्गाकडून मोफत किंवा मातीमोल किमतीने मिळणाऱ्या पाणी आणि हवेची कोणीच काळजी घेत नाही. त्याचे गंभीर परिणाम मानवाला त्यातही लहान मुलांच्या आरोग्यावर होताहेत. त्यामुळेच हवेचा गुणवत्ता निर्देशांक समजून घेणे गरजेचे आहे.

हवेची गुणवत्ता हा विषय १९६८ मध्ये प्रथम चर्चेत आला. प्रथम ज्या भागामध्ये लोकसंख्येची घनता जास्त आहे, अशा भागात हवा जास्त प्रमाणात खराब असल्याचे निदर्शनास आले. हवेची गुणवत्ता चांगली राहण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता यावी, या हेतूने संशोधकांचा एक गट कार्यरत झाला होता. हवेची गुणवत्ता खराब करणाऱ्या घटकांमध्ये ओझोन, कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन डाय ऑक्साईड यांचा समावेश होतो. तसेच धुलीकण, परागकण हेही प्रदूषण वाढवते. देशातील भूस्तराजवळ या घटकांचे प्रमाण किती आहे, याचे मापन करून हवेचा गुणवत्ता निर्देशांक निश्चित करण्यात येतो. ऑस्ट्रेलियामध्ये ० ते ३३ हवेचा गुणवत्ता निर्देशांक असेल तर ती हवा अतिशय चांगली मानतात. ३४ ते ६६ असेल तर चांगली हवा मानतात. ६७ ते ९९ बरी, १०० ते १४९ वाईट, १५० ते २०० अतिशय वाईट आणि २०० पेक्षा जास्त असल्यास धोकादायक समजतात. चीन आणि कॅनडामध्ये १ ते ३ हवेचा गुणवत्ता निर्देशांक धोकाविरहीत, ४ ते ६ असल्यासही सर्वसाधारण, ७ ते १० असल्यास तणावयुक्त आणि १० पेक्षा जास्त असल्यास धोकादायक असते. युरोपमध्ये ० ते २५ अतिशय चांगली, २५ ते ५० धोकाविरहीत, ५० ते ७५ मध्यम दर्जाची, ७५ ते १०० धोकादायक आणि १०० पेक्षा जास्त हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास अतिधोकादायक मानली जाते.

भारतातील हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाबद्दलची मानके केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १७ सप्टेंबर २०१४ रोजी निश्चित केली. भारतातील २४० पेक्षा जास्त शहरांमध्ये ३४२ पेक्षा जास्त केंद्रांमध्ये हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी यंत्रणा निर्माण केली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूरकडे याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच डॉक्टर्स, हवेचे अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसुधारक यांचे गट तयार केले आहेत. राज्य प्रदूषण नियंत्रक मंडळांचीही स्थापना केली. पूर्वी केवळ तीन घटकांच्या आधारे हवेची गुणवत्ता निश्चित करण्यात येत असे. आज आठ घटकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. भारतात सहा भागांमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक विभागण्यात आला आहे.

भारतात ० ते ५० हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास हवा अतिशय चांगली, ५१-१०० मध्ये असल्यास समाधानकारक, १०१-२०० हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास मध्यम दर्जाची, २०१-३०० असल्यास हवेचा दर्जा खराब, ३०१-४०० असल्यास हवा अतिशय खराब; तर ४०० पेक्षा जास्त असल्यास हवेचा दर्जा गंभीर असतो. ० ते ५० निर्देशांक असल्यास हवा अतिशय चांगली असते. अशा प्रकारची हवाच निरामय जगण्यासाठी गरजेची असते. ५१-१०० हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास आजारी असणाऱ्या, श्वसन विकार असणाऱ्या लोकांना थोडाफार त्रास होतो. हृदयाचे विकार असणारे लोक, अस्थमा किंवा फुफ्फुसाचे विकार असणाऱ्या रुग्णांना १०१ ते २०० हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास त्रास होतो. २०१-३०० हवा गुणवत्ता निर्देशांक असलेल्या हवेमध्ये दीर्घकाळ राहिल्यास अनेक लोकांना श्वसनाचा त्रास होतो किंवा एखाद्या आजारास बळी पडावे लागते. श्वसनप्रक्रियेतही अडथळा येतो. ३०१-४०० हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास श्वसनप्रक्रियेचे आजार उद्भवतात. ४०१ पेक्षा जास्त हवा गुणवत्ता निर्देशांक असल्यास आजारी लोकांचे आजार बळावून, त्यामुळे रुग्णांच्या जीवितास बाधा पोहोचते. निरोगी लोकांना आजार उद्भवू शकतात. दक्षिण कोरिया, मेक्सिको, जपानमध्येही हवेचे गुणवत्ता निर्देशांक ठरवण्याची हीच मानके आहेत.



हवेमध्ये प्रदूषके मिसळण्यास आणि त्यांचे प्रमाण वाढवण्यामध्ये मानवाचे वर्तन सर्वांत महत्त्वाची भूमिका पार पाडते. जास्तीत जास्त ऊर्जा वापरण्यासाठी जास्तीत जास्त इंधनाचा वापर करण्याची जगभर जणू शर्यत लागली आहे. काही छोटे देश प्रदूषण कमी करण्यासाठी मनापासून प्रयत्न करतात. मात्र, त्यांच्या प्रयत्नातून जगाच्या वातावरणात लक्षणीय परिणाम साध्य होत नाही. दगडी कोळसा, खनिज तेल आणि लाकूड यांचा मोठ्या प्रमाणात ज्वलनासाठी वापर करण्यात येतो. त्यांच्यामधून कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड तसेच शिशाची संयुगे वातावरणात मिसळतात. ओझोनचे वाढते प्रमाण जागतिक तापमान वाढीचे कारण बनत आहे. हवेत कोरडेपणा वाढतो. भारतासारख्या देशामध्ये धूळीचे प्रमाण वाढते. वाहनांची वाढती संख्या, रस्त्यांची खराब अवस्था, अनावश्यक पदार्थांचे, कचऱ्यांचे, शेतातील पिकांचे उपयुक्त नसणाऱ्या भागांचे ज्वलन यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढते. नियमांचे पालन न करता करण्यात येणारे खाणकामही मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढीचे कारण बनते. तापमान वाढीमुळे निसर्गचक्रामध्ये अनिश्चितता आली आहे.

अंतिमतः याचा परिणाम जल-जंगल-जमीन यांचा समतोल ढळण्यामध्ये होत आहे. एकीकडे रोगाने लोक आजारी पडणे, नैसर्गिक आपत्तीमध्ये जीवितास धोका निर्माण होणे आणि जैवविविधता घटणे या परिणामांची तीव्रता वाढत आहे. हे टाळणे आता कठीण आहे, मात्र ते अशक्य निश्चितच नाही. वातावरणात प्रदूषके मिसळणार नाहीत याची प्रत्येकाने दक्षता घ्यायला हवी. तसेच आहे ते घटवण्यासाठी हरित आवरणाचे क्षेत्र वाढवणे गरजेचे आहे. मात्र, पोटाच्या मागे लागले की आपण उपजीविकेसाठी आय कशी वाढेल याचाच विचार करतो. त्या कृतीचे एकूण काय परिणाम होतील याचा कधीच विचार केला जात नाही... हाच सर्वांत मोठा धोका आहे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 NOV 2024
पुढारी

# भौतिकशास्त्र विभागाचा नवनाथ चव्हाण नेट परीक्षेत देशात तिसरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



नवनाथ चव्हाण

एनटीए व सीएसआयआर यांच्या वतीने देशस्तरावरील सहायक प्राध्यापक पात्रता परीक्षेचा (नेट) परीक्षेचा निकाल जाहीर झाला. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागामधील माजी विद्यार्थी नवनाथ चव्हाण यांनी देशात तिसरे येऊन यश संपादन केले.

एनटीए व सीएसआयआरच्या वतीने २५ जुलै रोजी नेटची परीक्षा घेण्यात आली होती. २५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसले होते. चव्हाण यांचे पदव्युत्तर शिक्षण भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये २००९ मध्ये पूर्ण झाले. सध्या प्रा. डॉ. आर. के. निमठ यांच्याकडे ते संशोधन करत आहेत. नॅनोसायन्स अधिविभागात कार्यरत आहेत. नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी नवनाथ चव्हाण यांचे अभिनंदन केले.

13 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीएच.डी. प्रवेश परीक्षेला १२४६ विद्यार्थी उपस्थित

## ३१७ विद्यार्थी गैरहजर; तीन सत्रात परीक्षांचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षा मंगळवारी सुरळीतपणे पार पडल्या. १५६३ पैकी १२४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ३१७ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर राहिले. परीक्षा उपस्थितीची टक्केवारी ७९.७२ आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पीएच.डी. प्रवेश परीक्षा कोल्हापर, सांगली व सातारा जिल्ह्यामधील शहाजी महाविद्यालय, कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली, सावित्रीबाई फुले महाविद्यालय, सातारा केंद्रावर २३ अभ्यासक्रमांची परीक्षा झाली. सकाळी १० ते १२ यावेळेत अकौंटंसी/बिझनेस इकोनॉमिक्स (एम. कॉम), कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (एम.ई, एम.टेक), केमेस्ट्री, फूड सायन्स अँड टेक्नॉलॅजी, इलेक्ट्रॉनिक्स, फूड टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग विषयाच्या परीक्षा झाल्या.




### हिवाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या टप्प्यात पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या १० परीक्षांना सुमारे एक हजार विद्यार्थी बसले. पदवी, पदव्युत्तर प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ नोव्हेंबरपासून सुरू होतील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १ लाखांहून अधिक परीक्षा देणार आहेत.

दुपारी १ ते ३ वेळेत बिझनेस मॅनेजमेंट, इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, एज्युकेशन, हिंदी, मायक्रोबायलॉजी, फिजीक्स, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, झुलॉलॉजी, अकौंटन्सी, इंग्रजी तर दुपारनंतर ४ ते ६ यावेळेत इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, झुलॉजी, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स, केमिकल इंजिनिअरिंग, एन्व्हायरमेंटल सायन्स विषयाच्या परीक्षा झाल्या.

विद्याशाखेनिहाय वाणिज्य शाखेच्या ३ अभ्यासक्रमांसाठी १५३ पैकी १२१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ३२ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर होते. मानव्यशास्त्र शाखेच्या २ अभ्यासक्रमासाठी ३३४ पैकी २४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. ८९ विद्यार्थी अनुपस्थित होते. 'आयडीएस'च्या २ अभ्यासक्रमांसाठी ५९ पैकी ४२ विद्यार्थी परीक्षेला बसले. १७ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर राहिले. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेच्या १६ अभ्यासक्रमांसाठी १०१७पैकी ८३८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून १७९ विद्यार्थी परीक्षेस गैरहजर होते.